# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सभा दि.0६/१०/2022

## // गोषवारा //

<u>प्रकरण क्र.</u> (५४) : **मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील, मौजे नवघर येथील स.क्र.390/3,4,5, 391/1,2,3,4,5 392/1,2 393/1 452/3 या जमिनीवरील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) (क्षेत्र-13600.00 चौ.मी. पैकी 11484.39 चौ.मी.) व रहिवास क्षेत्रासह एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे विनियम क्र.11.1 टेबल क्र.11-A मधील अ.क्र.4 खालील तरतुदीनुसार समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून (Accomodation Reservation) आरक्षण क्र.302 चे विकसन करणेकामी "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) मधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र 650.50 चौ.मी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करणेकामी प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी बाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) हि दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून ती दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना ही दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली असून सदर मंजूर विकास योजनेमध्ये मौजे नवघर येथील स.क्र.390/3,4,5, 391/1,2,3,4,5 392/1,2 393/1 452/3 चे क्षेत्र "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) या आरक्षणामध्ये समाविष्ट आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) क्षेत्र 13600.00 चौ.मी. यासाठी "मिरा भाईंदर महानगरपालिका" हे समुचित प्राधिकरण आहे. सदरच्या क्षेत्रापैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र 950.03 चौ.मी. असून उर्वरित क्षेत्र हे खाजगी मालकीचे आहे. त्याअनुषंगाने प्रकरण क्र.140, ठराव क्र.107 ठराव दि.18/01/2016 अन्वये मा. महासभेने प्रामुख्याने खालील प्रमाणे ठराव पारीत केलेला आहे.

**"जागामालक / अधिकारपत्रधारक यांनी महानगरपालिकेस बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्यास महानगरपालिकेस फक्त बांधीव इमारत मिळणार आहे. त्यानंतर सदर इमारतीमध्ये अंतर्गत सजावटीसह यंत्र सामुग्री व अधिकारी, कर्मचारी वर्ग लागणार असून त्यासाठीचा खर्च महानगरपालिकेस परवडणार नाही."**

तथापि सदरचा ठराव हा पारीत होऊन सर्वसाधारणपणे 06 वर्षांचा कालावधी उलटून देखील तो ठराव संबंधित जमीन मालकास मान्य नसल्याने जमीन मालकाने विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) खालील जमिन महानगरपालिकेस हस्तांतरीत न केल्याने सदरच्या ठरावाची अंमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही.

यापूर्वी "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) हे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकसीत करणेसाठी यापूर्वी पत्र क्र.मनपा/नर/860/2007-08 दि.11/06/2007 अन्वये सदरचे आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतुदी अन्वये जागामालकास विकसीत करणेसाठी यापुर्वी जा.क्र.मनपा/नर/860/2007-08, दि.11/06/2007 अन्वये रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक परवानगी प्राप्त करण्यासाठी नाहरकत दाखला दिलेला असून सदरच्या परवानगीसाठी दि.17/10/2008 रोजी 1 वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. सदरच्या परवानगीची मुदत संपलेली असून परवानगी व्यपगत झालेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) चे क्षेत्र 13600.00 चौ.मी. इतके आहे. सदर क्षेत्रापैकी 11484.39 चौ.मी. इतके क्षेत्र खाजगी मालकीचे असून विकासक-श्री. सुरेश देवचंद शहा यांच्या मालकीचे आहे. याव्यतिरिक्त महानगरपालिकेच्या ताब्यातील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) मधील 950.03 चौ.मी. इतक्या क्षेत्रापैकी 650.50 चौमी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करुन एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र. 11.1 मधील टेबल 11-A मधील क्र.04 Health Facility, मधील क्र. B "हॉस्पीटल" साठी तरतूदी व General Conditons / Notes to Allow development under above regulation मधील तदतूद क्र.(1) अ.क्र.04 व त्यानुसार "ड" वर्ग महानगरपालिकेसाठीच्या तरतूदीनुसार विकासकाने प्रस्तावामध्ये नमूद केलेले एकूण आरक्षणाखालील क्षेत्र 11484.39 चौ.मी. च्या 40% क्षेत्र म्हणजे 4593.76 चौ.मी. इतक्या क्षेत्राचा स्वंतत्र भुखंड हा "म्युनिसिपल हॉस्पीटल" च्या आरक्षणाच्या विकसनासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरीत करणार असल्याबाबत विकासक यांचेवतीने सल्लागार अभियंता यांनी तयारी दर्शविलेली आहे. त्याप्रमाणे विषयांकित मौजे नवघर येथील स.क्र.390(जुना)

154(नविन) हि.क्र.3,4,5, स.क्र.391(जुना) 162(नविन) हि.क्र.1,2,3,4,5 स.क्र.392(जुना) 153(नविन) हि.क्र.1,2 स.क्र.393(जुना) 162(नविन) हि.क्र.1 स.क्र.452(जुना) 152(नविन) हि.क्र.3 या जमिनींच्या संदर्भात दि.17/06/2022 रोजीच्या पत्रान्वये संबधित सल्लागार अभियंता मे. अनिष ॲण्ड असो. यांनी मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. 302 "म्युनिसिपल हॉस्पीटल" या आरक्षणाच्या समावेशक आरक्षण माध्यमातून विकसन करणेकामी स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेकरीता संमतीपत्र निर्गमित करणेसह, "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आ.क्र.302) मधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले एकूण 950.03 चौ.मी. क्षेत्रापैकी 650.50 चौ.मी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करणेकरीता प्रस्ताव सादर केलेला आहे.

विकासकाने त्यांच्या प्रस्तावात नमुद केलेल्या एकूण आरक्षणाखालील क्षेत्र 11484.39 चौ.मी. क्षेत्राच्या 40% म्हणजेच 4593.76 चौ.मी. एवढया क्षेत्राचा भुखंड हा महानगरपालिकेस 25% बांधकाम करुन देणे विकासकावर बंधनकारक आहे. याशिवाय 25% बांधकामापेक्षा जास्त बांधकाम संबंधित विकासकाने महानगरपालिकेस करुन दिल्यास एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र.11.1, त्यामधील General Conditions / Notes मधील Note क्र.-i, vi व विनियम क्र. 11.2.5 नुसार वाढीव केलेल्या बांधकामाच्या बांधीव हस्तांतरणीय चटई क्षेत्राच्या (Construction T.D.R.) स्वरुपात मोबदला मिळणार आहे. त्यामुळे यापूर्वी केलेला मा. महासभा ठराव क्र.107 प्रकरण क्र.140 दि.18/01/2016 हा महानगरपालिकेसाठी फायदेशीर नसल्याने व ठरावात नमुद केल्यानुसार महानगरपालिकेच्या इमारतीसाठी इमारतीमधील अंतर्गत सजावटीसह यंत्र सामुग्री व अधिकारी कर्मचारी वर्ग यांच्यासाठी चा खर्च हा शासनाकडून महानगरपालिकेस उपलब्ध होणार नसल्यामुळे सदरचा ठराव हा निष्प्रभावित करणे आवश्यक राहील. त्यामुळे संबंधित विकासक यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन एकत्रित विकास व नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र.11.1 नुसार सुधारीत प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त करुन घेण्यात आलेला आहे.

एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली ही दि.02/12/2020 पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेसह संपूर्ण राज्याकरीता (शासन राजपत्रातील नमूद भाग वगळून) लागू झालेली आहे. त्यानुसार सदर नियमावलीतील विनियम क्र.11 मधील तरतुदींनुसार अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे

"म्युनिसिपल हॉस्पीटल" (आ.क्र.302) मधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या 950.03 चौ.मी. क्षेत्रापैकी 650.50 चौ.मी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करणे आवश्यक आहे. त्याकरीता याप्रकरणी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या प्रशासकीय मंजुरीची आवश्यकता आहे. तरी यापूर्वी केलेला मा. महासभा ठराव क्र.107, प्रकरण क्र.140 दि.18/01/2016 हा पारित होवून साधारणत: 06 वर्षाचा कालावधी उलटून देखील सदरचा ठराव हा संबंधित जमीन मालक यांना मान्य नसल्याने त्यांनी विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात हॉस्पिटलची जमीन महानगरपालिकेकडे हस्तांतरण केलेली नाही. त्यामुळे सदरच्या ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. सबब आता विकासकाने केलेल्या दि.17/06/2022 अन्वये केलेली विनंती व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र. 11 मधील तरतुदींचा विचार करता विषयांकित प्रकरणी यापूर्वीच उपरोक्त ठराव हा निष्प्रभावित करुन नव्याने ठराव पारीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार विषयांकित जमिनीचे महानगरपालिकेच्या ताब्यातील एकूण क्षेत्र 950.03 चौ.मी. पैकी 650.50 चौ.मी. इतक्या क्षेत्राचे स्थानबदल (Relocation) करणेकरीता प्रशासकीय मंजुरी आवश्यक असून त्याकरीता ठराव पारीत करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने सदर प्रकरणी स्थानबदल (Relocation) करणेच्या कार्यवाहीस मा. प्रशासक यांची मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव सविनय सादर करण्यात येत आहे.

**(मा. आयुक्त तथा प्रशासक सो., यांचे मान्यतेने.)**

**( हे. रा. ठाकूर )**
**सहाय्यक संचालक, नगररचना**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

गोषवारा प्राप्त दि 6/10/2022 स.11.20
मा. महासभा गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र. 62 वर्ष 22/23

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## प्रशासकीय ठराव क्र. ५३ दि. ०६/१० /2022

**प्रकरण क्र.** ५४ :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजुर विकास योजनेमधील, मौजे नवघर येथील स.क्र.390/3,4,5, 391/1,2,3,4,5 392/1,2 393/1 452/3 या जमिनीवरील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) (क्षेत्र-13600.00 चौ.मी. पैकी 11484.39 चौ.मी.) व रहिवास क्षेत्रासह एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे विनियम क्र.11.1 टेबल क्र.11-A मधील अ.क्र.4 खालील तरतुदीनुसार समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून (Accomodation Reservation) आरक्षण क्र.302 चे विकसन करणेकामी "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) मधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र 650.50 चौ.मी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करणेकामी प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी बाबत.

### // कार्यालयीन प्रस्तावना //

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) हि दि.14/05/1997 रोजी मंजूर झालेली असून, ती दि.15/07/1997 पासून अंमलात आलेली आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना ही दि.25/08/2000 रोजी मंजूर झालेली असून ती दि.15/10/2000 पासून अंमलात आलेली असून सदर मंजूर विकास योजनेमध्ये मौजे नवघर येथील स.क्र.390/3,4,5, 391/1,2,3,4,5 392/1,2 393/1 452/3 चे क्षेत्र "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) या आरक्षणामध्ये समाविष्ट आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेमधील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) क्षेत्र 13600.00 चौ.मी. यासाठी "मिरा भाईंदर महानगरपालिका" हे समुचित प्राधिकरण आहे. सदरच्या क्षेत्रापैकी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र 950.03 चौ.मी. असून उर्वरित क्षेत्र हे खाजगी मालकीचे आहे. त्याअनुषंगाने प्रकरण क्र.140, ठराव क्र.107 ठराव दि.18/01/2016 अन्वये मा. महासभेने प्रामुख्याने खालील प्रमाणे ठराव पारीत केलेला आहे.

**"जागामालक / अधिकारपत्रधारक यांनी महानगरपालिकेस बांधीव क्षेत्र महानगरपालिकेस हस्तांतरीत केल्यास** महानगरपालिकेस **फक्त बांधीव इमारत मिळणार आहे. त्यानंतर सदर इमारतीमध्ये अंतर्गत**

**सजावटीसह यंत्र सामुग्री व अधिकारी, कर्मचारी वर्ग लागणार असून त्यासाठीचा खर्च महानगरपालिकेस परवडणार नाही."**

तथापि सदरचा ठराव हा पारीत होऊन सर्वसाधारणपणे 06 वर्षांचा कालावधी उलटून देखील तो ठराव संबंधित जमीन मालकास मान्य नसल्याने जमीन मालकाने विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) खालील जमिन महानगरपालिकेस हस्तांतरीत न केल्याने सदरच्या ठरावाची अंमलबजावणी आजपर्यंत झालेली नाही.

यापूर्वी "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) हे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातुन विकसीत करणेसाठी यापूर्वी पत्र क्र.मनपा/नर/860/2007-08 दि.11/06/2007 अन्वये सदरचे आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतुदी अन्वये जागामालकास विकसीत करणेसाठी यापुर्वी जा.क्र.मनपा/नर/860/2007-08, दि.11/06/2007 अन्वये रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक परवानगी प्राप्त करण्यासाठी नाहरकत दाखला दिलेला असून सदरच्या परवानगीसाठी दि.17/10/2008 रोजी 1 वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. सदरच्या परवानगीची मुदत संपलेली असून परवानगी व्यपगत झालेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेतील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) चे क्षेत्र 13600.00 चौ.मी. इतके आहे. सदर क्षेत्रापैकी 11484.39 चौ.मी. इतके क्षेत्र खाजगी मालकीचे असून विकासक-श्री. सुरेश देवचंद शहा यांच्या मालकीचे आहे. याव्यतिरिक्त महानगरपालिकेच्या ताब्यातील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) मधील 950.03 चौ.मी. इतक्या क्षेत्रापैकी 650.50 चौमी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करुन एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र. 11.1 मधील टेबल 11-A मधील क्र.04 Health Facility, मधील क्र. B "हॉस्पीटल" साठी तरतूदी व General Conditons / Notes to Allow development under above regulation मधील तदतूद क्र.(1) अ.क्र.04 व त्यानुसार "ड" वर्ग महानगरपालिकेसाठीच्या तरतूदीनुसार विकासकाने प्रस्तावामध्ये नमूद केलेले एकूण आरक्षणाखालील क्षेत्र 11484.39 चौ.मी. च्या 40% क्षेत्र म्हणजे 4593.76 चौ.मी. इतक्या क्षेत्राचा स्वंतत्र भुखंड हा "म्युनिसिपल हॉस्पीटल" च्या आरक्षणाच्या विकसनासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस विनामूल्य हस्तांतरीत करणार असल्याबाबत विकासक यांचेवतीने सल्लागार अभियंता यांनी तयारी दर्शविलेली आहे. त्याप्रमाणे विषयांकित मौजे नवघर येथील स.क्र.390(जुना) 154(नविन) हि.क्र.3,4,5,

स.क्र.391(जुना) 162(नविन) हि.क्र.1,2,3,4,5 स.क्र.392(जुना) 153(नविन) हि.क्र.1,2 स.क्र.393(जुना) 162(नविन) हि.क्र.1 स.क्र.452(जुना) 152(नविन) हि.क्र.3 या जमिनींच्या संदर्भात दि.17/06/2022 रोजीच्या पत्रान्वये संबधित सल्लागार अभियंता मे. अनिष ॲण्ड असो. यांनी मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्र. 302 "म्युनिसिपल हॉस्पीटल" या आरक्षणाच्या समावेशक आरक्षण माध्यमातून विकसन करणेकामी स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेकरीता संमतीपत्र निर्गमित करणेसह, "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आ.क्र.302) मधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले एकूण 950.03 चौ.मी. क्षेत्रापैकी 650.50 चौ.मी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करणेकरीता प्रस्ताव सादर केलेला आहे.

विकासकाने त्यांच्या प्रस्तावात नमुद केलेल्या एकूण आरक्षणाखालील क्षेत्र 11484.39 चौ.मी. क्षेत्राच्या 40% म्हणजेच 4593.76 चौ.मी. एवढया क्षेत्राचा भुखंड हा महानगरपालिकेस 25% बांधकाम करुन देणे विकासकावर बंधनकारक आहे. याशिवाय 25% बांधकामापेक्षा जास्त बांधकाम संबंधित विकासकाने महानगरपालिकेस करुन दिल्यास एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र.11.1, त्यामधील General Conditions / Notes मधील Note क्र.-i, vi व विनियम क्र. 11.2.5 नुसार वाढीव केलेल्या बांधकामाच्या बांधीव हस्तांतरणीय चटई क्षेत्राच्या (Construction T.D.R.) स्वरुपात मोबदला मिळणार आहे. त्यामुळे यापूर्वी केलेला मा. महासभा ठराव क्र.107 प्रकरण क्र.140 दि.18/01/2016 हा महानगरपालिकेसाठी फायदेशीर नसल्याने व ठरावात नमुद केल्यानुसार महानगरपालिकेच्या इमारतीसाठी इमारतीमधील अंतर्गत सजावटीसह यंत्र सामुग्री व अधिकारी कर्मचारी वर्ग यांच्यासाठी चा खर्च हा शासनाकडून महानगरपालिकेस उपलब्ध होणार नसल्यामुळे सदरचा ठराव हा निष्प्रभावित करणे आवश्यक राहील. त्यामुळे संबंधित विकासक यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करुन एकत्रित विकास व नियंत्रण प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र.11.1 नुसार सुधारीत प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त करुन घेण्यात आलेला आहे.

एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली ही दि.02/12/2020 पासून मिरा भाईंदर महानगरपालिकेसह संपूर्ण राज्याकरीता (शासन राजपत्रातील नमूद भाग वगळून) लागू झालेली आहे. त्यानुसार सदर नियमावलीतील विनियम क्र.11 मधील तरतुदींनुसार अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आ.क्र.302) मधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेल्या 950.03 चौ.मी. क्षेत्रापैकी 650.50 चौ.मी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करणे आवश्यक आहे. त्याकरीता

याप्रकरणी मा. आयुक्त तथा प्रशासक यांच्या प्रशासकीय मंजुरीची आवश्यकता आहे. तरी यापूर्वी केलेला मा. महासभा ठराव क्र.107, प्रकरण क्र.140 दि.18/01/2016 हा पारित होवून साधारणत: 06 वर्षाचा कालावधी उलटून देखील सदरचा ठराव हा संबंधित जमीन मालक यांना मान्य नसल्याने त्यांनी विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात हॉस्पिटलची जमीन महानगरपालिकेकडे हस्तांतरण केलेली नाही. त्यामुळे सदरच्या ठरावाची अंमलबजावणी झालेली नाही. सबब आता विकासकाने केलेल्या दि.17/06/2022 अन्वये केलेली विनंती व एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील विनियम क्र. 11 मधील तरतुदींचा विचार करता विषयांकित प्रकरणी यापूर्वीच उपरोक्त ठराव हा निष्प्रभावीत करुन नव्याने ठराव पारीत करणे आवश्यक आहे. त्यानुसार विषयांकित जमिनीचे महानगरपालिकेच्या ताब्यातील एकूण क्षेत्र 950.03 चौ.मी. पैकी 650.50 चौ.मी. इतक्या क्षेत्राचे स्थानबदल (Relocation) करणेकरीता प्रशासकीय मंजुरी आवश्यक असून त्याकरीता ठराव पारीत करणे गरजेचे आहे.

## प्रशासकीय ठराव क्र. ५३ दि. ०६/१० /2022

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या नगररचना विभागामार्फत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे नवघर येथील स.क्र.390/3,4,5, 391/1,2,3,4,5 392/1,2 393/1 452/3 या जमिनीवरील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) (क्षेत्र-13600.00 चौ.मी. पैकी 11484.39 चौ.मी.) व रहिवास क्षेत्रासह एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे विनियम क्र.11.1 टेबल क्र.11-A मधील अ.क्र.4 खालील समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून(Accomodation Reservation) आरक्षण क्र.302 चे विकसन करणेकामी "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) मधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र 650.50 चौ.मी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करणेच्या अनुषंगाने सादर फेरबदल प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452(अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एम.सी.ओ.2020/प्रक्र.71(भाग-1)/नवि-14, दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा. महासभेचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या विषयास अनुसरून

मौजे नवघर येथील स.क्र.390/3,4,5, 391/1,2,3,4,5 392/1,2 393/1 452/3 या जमिनीवरील "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) (क्षेत्र-13600.00 चौ.मी. पैकी 11484.39 चौ.मी.) व रहिवास क्षेत्रासह एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीचे विनियम क्र.11.1 टेबल क्र.11-A मधील अ.क्र.4 खालील तरतुदींनुसार समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून(Accomodation Reservation) आरक्षण क्र.302 चे विकसन करणेकामी "म्युनिसिपल हॉस्पीटल" (आरक्षण क्र.302) मधील महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेले क्षेत्र 650.50 चौ.मी. इतके क्षेत्र स्थानबदल (Relocation) करणेच्या अनुषंगाने सदर स्थानबदलाच्या प्रस्तावास पूर्वीच्या मा. महासभा ठराव क्र. 107, प्रकरण क्र. 140 दि.18/01/2016 हा निष्प्रभावित करुन मान्यता देण्यात येत आहे.

पुढील आवश्यक कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पद्धतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
प्रशासक तथा आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // बांधकाम विभाग //

## // गोषवारा //

सभा दि. 6/10/2022

**प्रकरण क्रमांक. (५५)** - केंद्र पुरस्कृत अमृत - 2 अभियांन अंतर्गत भाईंदर (पुर्व) नवघर येथील जुना तलाव पुर्नजिवित करणे व रा.म.क्र.08 वरील सातकरी तलाव पुर्नजिवित करणे कामी महानगरपालिकेचा हिस्सा उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबत..

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक - अमृत - 2022/प्र.क्र.141/नवि-33 दिनांक 14 जुलै, 2022 अन्वये पारित करण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या अमृत - 2 अभियांन अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका शहरातील तलावाचे पुर्न:जीवन करणे कामी 5 तलावाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी सादर केलेला होतो. प्रस्तावित केलेल्या 5 तलावापैकी खालील दोन तलावाच्या कामांना राज्य व केंद्र शासनाची परवानगी प्राप्त झालेली आहे. सदरील कामांना महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग ठाणे यांच्याकडून दि.30/09/2022 रोजी तांत्रिक मंजुरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | भाईदर (पुर्व) नवघर येथील जुना तलाव पुर्नजिवित करणे. | रु.1,88,21,774/- |
| 2. | रा.म.क्र.08 वरील सातकरी तलाव पुर्नजिवित करणे. | रु.1,70,03,734/- |

अमृत -2 अभियांना अंतर्गत नागरीक स्वराज्य संस्थेमार्फत सादर होणाऱ्या प्रकल्पांसाठी एकुण प्रकल्प किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य शासन व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आर्थिक हिस्स्यानुसार करावयाचे आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. तरी सदर प्राप्त अधिकारात वरील नमुद प्रस्तावास मनपा हिस्सा खर्चासह मान्यता देणेस शिफारस आहे.

(दिपक खांबित)
**शहर अभियंता**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. आयुक्त यांच्या मान्यतेने**

PC-6/2022-23/NM/MG-1

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दि.06 ऑक्टोंबर 2022 रोजी दुपारी ०३.00 वाजता.**

विषय क्र. ( ५५ ) : मा.आयुक्त महोदयाकडील कामकाज

केंद्र पुरस्कृत अमृत - 2 अभियांन अंतर्गत भाईंदर (पुर्व) नवघर येथील जुना तलाव पुर्नजिवित करणे व रा.म.क्र.08 वरील सातकरी तलाव पुर्नजिवित करणे कामी महानगरपालिकेचा हिस्सा उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबत..

**कार्यालयीन प्रस्तावना**

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक-अमृत - 2022/प्र.क्र.141/नवि-33 दिनांक 14 जुलै, 2022 अन्वये पारित करण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या अमृत - 2 अभियांन अंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका शहरातील तलावाचे पुर्न:जीवन करणे कामी 5 तलावाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजुरीसाठी सादर केलेला होतो. प्रस्तावित केलेल्या 5 तलावापैकी खालील दोन तलावाच्या कामांना राज्य व केंद्र शासनाची परवानगी प्राप्त झालेली आहे. सदरील कामांना महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभाग ठाणे यांच्याकडून दि.30/09/2022 रोजी तांत्रिक मंजुरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (पुर्व) नवघर येथील जुना तलाव पुर्नजिवित करणे. | रु.1,88,21,774/- |
| 2. | रा.म.क्र.08 वरील सातकरी तलाव पुर्नजिवित करणे. | रु.1,70,03,734/- |

अमृत -2 अभियांना अंतर्गत नागरीक स्वराज्य संस्थेमार्फत सादर होणाऱ्या प्रकल्पांसाठी एकुण प्रकल्प किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य शासन व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आर्थिक हिस्स्यानुसार करावयाचे आहे. नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-2020/प्र.क्र.71 (भाग-2) / नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुद व विशेषत: कलम 452 अ च्या (1 अ) व (1 ब) मधील तरतुदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व अधिकार प्राप्त झाले आहेत. वरील कामांना मनपा हिस्सा खर्चास प्रशासकीय ठरावाव्दारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र.५४ दिनांक 06/10/2022**

केंद्र पुरस्कृत अमृत - 2 अभियांन अंतर्गत भाईंदर (पुर्व) नवघर येथील जुना तलाव पुर्नजिवित करणे व रा.म.क्र.08 वरील सातकरी तलाव पुर्नजिवित करणे कामी शासन निर्णयानुसार महापालिकेचा हिस्सा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे या कामाचे प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत : कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार, महाराष्ट्र शसन, नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक :- एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकरानुसार मी, दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका मा.महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार खालील कामाच्या अंदाजपत्रकातील मनपा हिस्साच्या खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (पुर्व) नवघर येथील जुना तलाव पुर्नजिवित करणे. | रु.1,88,21,774/- |
| 2. | रा.म.क्र.08 वरील सातकरी तलाव पुर्नजिवित करणे. | रु.1,70,03,734/- |

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**(दिलीप ढोले)**
**प्रशासक तथा आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रत बांधकाम विभागाकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा विभाग

// गोषवारा //

सभा दि. ६/१०/२०२२

**प्रकरण क्र.** (५६) :- केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनातंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था करणे या कामी सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास तसेच मनपा हिस्सा उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबत

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक - अमृत 2022/प्र.क्र.141/नवि-33 दिनांक 14 जुलै 2022 अन्वये पारित करण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या अमृत -2 अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था करणे सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. या सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी रु.516.77 कोटी किंमतीच्या सुधारीत प्रकल्प अहवालस दि.20/09/2022 रोजी सुधारीत तांत्रिक मंजूरी देण्यात आलेली आहे.

अमृत 2.0 अभियांनातंर्गत नागरीक स्वराज्य् संस्थेमार्फत सादर होणाऱ्या प्रकल्पासाठी एकूण प्रकल्प् किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य् शासन व नागरीक स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आर्थिक हिश्यानुसार करावयाचे आहे. नगर विकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) नवि-14 मा. महानगरपालिका दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व आधिकार प्राप्त झाले आहेत. तरी उपरोक्त कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास तसेच मनपा हिश्याच्या खर्चास प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनातंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था करणे या कामी सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास तसेच शासन निर्णयानुसार महानगरपालिकेचा हिस्सा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था करणे या कामाच्या रु. 516.77 कोटी किंमतीच्या सुधारीत अंदाजपत्रकीय कामास तसेच मनपा हिश्याच्या रु.155.03 कोटी खर्चास व कोणत्याही कारणामुळे या खर्चात वाढ झाल्यास सदर वाढीव खर्च महानगरपालिकेमार्फत करणेस प्रशासकीय मान्यता मिळणेस शिफारस आहे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता (पा.पु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. आयुक्त सो. यांच्या मान्यतेने.**

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव दि. ०६/ १० /2022 रोजी दुपारी ३.०० वाजता**

**विषय क्र. ( ५६ ) :- मा. आयुक्त महोदयाकडील कामकाज**

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनातंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था करणे या कामी सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास तसेच मनपा हिस्सा उपलब्ध करुन देणेस मान्यता मिळणेबाबत

**कार्यलयीन प्रस्तावना**

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनाची राज्यात अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक - अमृत 2022/प्र.क्र.141/नवि-33 दिनांक 14 जुलै 2022 अन्वये पारित करण्यात आला आहे. त्यानुसार केंद्र शासनाच्या अमृत -2 अभियान अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था करणे सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. या सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी रु.516.77 कोटी किंमतीच्या सुधारीत प्रकल्प अहवालस दि.20/09/2022 रोजी सुधारीत तांत्रिक मंजूरी देण्यात आलेली आहे.

अमृत 2.0 अभियांनातंर्गत नागरीक स्वराज्य् संस्थेमार्फत सादर होणाऱ्या प्रकल्पासाठी एकूण प्रकल्प् किंमतीपैकी केंद्र शासन, राज्य् शासन व नागरीक स्थानिक स्वराज्य संस्थाच्या आर्थिक हिश्यानुसार करावयाचे आहे. नगर विकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2) नवि-14 मा. महानगरपालिका दिनांक 26 ऑगस्ट 2022 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदी व विशेषत: कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) मधील तरतूदीनुसार मा.आयुक्त यांची प्रशासक पदी नियुक्ती करण्यात आली असून त्यांना अधिनियमातील सर्व आधिकार प्राप्त झाले आहेत. तरी उपरोक्त कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास तसेच मनपा हिश्याच्या खर्चास प्रशासकीय ठरावाद्वारे मान्यता देण्याचा प्रस्ताव प्रशासनाने सादर केलेला आहे.

**प्रशासकीय ठराव क्र. ५५ दिनांक. ०६/१०/२०२२**

केंद्र पुरस्कृत अमृत 2.0 अभियांनातंर्गत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था करणे या कामी सुधारीत सविस्तर प्रकल्प अहवालास तसेच शासन निर्णयानुसार महानगरपालिकेचा हिस्सा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे या कामाच्या प्रस्तावाचे अवलोकन करण्यात आले.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेषत : कलम 452 (अ) च्या (1अ) व (1ब) नुसार महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ 2020/प्र.क्र.71 (भाग-2)/नवि-14 दि.26 ऑगस्ट 2022 अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, श्री. दिलीप ढोले, प्रशासक, मिरा भाईंदर महानगरपालिका, मा. महानगरपालिका महासभेच्या अधिकाराचा वापर करुन प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सुर्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेवर आधारीत वाढीव मुख्य जलवाहिन्या व वितरण व्यवस्था करणे या कामाच्या रु. 516.77 कोटी किंमतीच्या सुधारीत अंदाजपत्रकीय कामास तसेच मनपा हिश्याच्या रु. 155.03 कोटी खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच कोणत्याही कारणामुळे या खर्चात वाढ झाल्यास सदर वाढीव खर्च महानगरपालिकेमार्फत केला जाईल.

वरील कामाबाबतची पुढील कार्यवाही नियमानुसार संबंधित विभागाने विहीत पध्दतीने करावी.

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

(दिलीप ढोले)
**प्रशासक तथा आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत :-** पाणी पुरवठा विभागाकडे योग्यत्या कार्यवाहीसाठी रवाना.